15 OCT 2024

पुढारी


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सर्व महाविद्यालये, अधिविभागात एकाचवेळी वाचन प्रेरणा दिन!

- शिवाजी विद्यापीठाचा उपक्रम; शिवराज्याभिषेक सोहळ्याचे वर्णन वाचणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त यंदाच्या वर्षापासून संलग्न सर्व महाविद्यालये, अधिविभागात 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात येणार आहे. १५ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० ते ११



या कालावधीत हा उपक्रम विद्यापीठासह सर्व संलग्नित महाविद्यालयांत एकाचवेळी राबविला जाणार आहे.

कार्यक्रमाच्या अनुषंगाने अधिविभाग प्रमुख व प्राचार्य यांनी सर्व विद्यार्थ्यांना कार्यक्रमाची माहिती द्यावी. यावर्षी छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून शिवराज्याभिषेक सोहळ्याचे वर्णन असणाऱ्या मजकुराचे वाचन करावे, अशा सूचना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिल्या आहेत.

## उपक्रम राबविण्याची नियमावली...

वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याच्या अनुषंगाने बॅ. खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राने नियमावली तयार केली आहे. १५ ऑक्टोबर रोजी विद्यापीठातील सर्व अधिविभाग व संलग्न महाविद्यालयांनी नावांसहित 'वाचन प्रेरणा दिन' असा बॅनर तयार करावा. सकाळी डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन त्यानंतर प्रत्यक्ष वाचन करावे. कार्यक्रमात सर्व घटकांच्या सहभागासाठी परिपत्रक काढून सूचना द्याव्यात. सहभागींची संख्या, कार्यक्रमाची छायाचित्रे, चित्रफीत यूट्यूबवर अपलोड करून त्याची लिंक महाविद्यालयाला संलग्नीकरणाबाबत माहिती भरण्यासाठी दिलेल्या संगणक प्रणालीमध्ये भरावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.



कोल्हापूर : डॉ. तारा भवाळकर यांचा सांगली येथील निवासस्थानी सत्कार करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. यावेळी डावीकडून डॉ. नंदकुमार मोरे, रणधीर शिंदे, अविनाश सप्रे उपस्थित होते.

# डॉ. तारा भवाळकर प्रागतिक स्त्रीवादी संशोधक

## कुलगुरू डॉ. शिर्के : शिवाजी विद्यापीठातर्फे सत्कार

कोल्हापूर, ता. १४ : 'मराठी भाषेला अभिजात दर्जा घोषित झाला आहे. त्याबरोबरच डॉ. तारा भवाळकर यांच्यासारख्या प्रागतिक स्त्रीवादी संशोधक-साहित्यिकेची नवी दिल्ली येथील नियोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड होणे हा अत्यंत चांगला संकेत असल्याचे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगली येथे काढले.

नवी दिल्ली येथे होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक, संशोधक व समीक्षक असलेल्या डॉ. तारा भवाळकर यांची नुकतीच निवड करण्यात आली. त्या निमित्ताने कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगली येथील त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि ग्रंथभेट देऊन विद्यापीठातर्फे अभिनंदन आणि सत्कार केला. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'मराठी साहित्य संमेलनाच्या शतकभराच्या वाटचालीमध्ये अवघ्या सहा महिलांना अध्यक्षपद भूषविण्याची संधी मिळाली आहे. त्यामध्ये डॉ. भवाळकर यांचा समावेश झाला, ही अतीव अभिमानाची बाब आहे. त्यातही नवी दिल्ली येथे यापूर्वी झालेल्या संमेलनाचे अध्यक्षपद ज्येष्ठ तत्त्वज्ञ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी भूषविले होते. त्यानंतर आता डॉ. भवाळकर या देशाच्या राजधानीमधून जगभरातील मराठी भाषिकांना आपल्या अध्यक्षीय भाषणाद्वारे संबोधित करतील, ही मराठी भाषेच्या इतिहासातील एक महत्त्वाची घटना ठरेल.'

डॉ. भवाळकर यांनी विद्यापीठाशी माझा खूप जुना स्नेह आहे. त्यामुळे विद्यापीठ परिवारातर्फे कुलगुरूंनी केलेला गौरव हा माझ्या कुटुंबीयांनीच केला आहे, अशी भावना व्यक्त केली. यावेळी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अविनाश सप्रे उपस्थित होते.


जनसंपर्क कक्ष
15 OCT 2024
तरुण भारत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# प्रदूषक रंगद्रव्यांपासून पिण्यायोग्य पाण्याची निर्मिती

## विद्यापीठाच्या रसायनशास्त्रज्ञांचे संशोधन; युके पेटंट प्राप्त


डॉ. के. एम. गरडकर


डॉ. नाना गावडे


डॉ. संतोष बाबर


डॉ. महादेव सुवर्णकार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

कोल्हापूर जिल्ह्यात, विशेषत: इचलकरंजी परिसरात मोठ्या प्रमाणात वस्त्रोद्योग आहेत. या वस्त्रोद्योगांमधून विषारी रंगद्रव्यांचे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. मात्र, आता या पर्यावरणाला हानिकारक अशा रंगद्रव्यांवर सूर्यप्रकाशाच्या सहाय्याने प्रक्रिया करून ती पूर्णत: नष्ट करून अगदी पिण्यायोग्य पाणी तयार करण्याचे संशोधन शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्रज्ञांनी यशस्वी केले आहे. नुकतेच त्यांच्या या संशोधनाला युके पेटंट प्राप्त झाले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. के. एम. गरडकर आणि त्यांचे सहकारी डॉ. नाना गावडे, डॉ. संतोष बाबर आणि डॉ. महादेव सुवर्णकार यांनी संशोधन केले आहे. प्रा. गरडकर यांच्या चमूने युके पेटंटप्राप्त संशोधनांतर्गत पर्यावरणपूरक मेटल ऑक्साईड नॅनोकम्पोझिट अत्यंत सोप्या पद्धतीने तयार करून त्यांचा वापर उत्प्रेरक म्हणून केला. ही संपूर्ण प्रक्रिया सूर्यप्रकाशात घडवून आणली जाते. याअंतर्गत पर्यावरणाला हानिकारक असणारी रंगद्रव्ये पूर्णपणे नष्ट करून पिण्यायोग्य पाणी तयार केले जाते. ही प्रक्रिया फारशी खर्चिक नसल्याने वस्त्रोद्योगांसाठी एक प्रकारे वरदानच ठरणार आहे.

डॉ. गरडकर म्हणाले, औद्योगिक सांडपाणी शुद्ध करण्यासाठी नॅनोमटेरियल फोटोकॅटलिस्ट हा एक प्रभावी आणि किफायतशीर पर्याय आहे. त्या दिशेने संशोधनाची दिशा केंद्रित करून सूर्यप्रकाशात रंगद्रव्यांवर प्रक्रिया करण्याची पद्धती शोधून काढण्यात यश आले. भविष्यात देखील सोप्या हरित पद्धतीने आणि सूर्यप्रकाशात काम करणारे आणखी क्रियाशील नॅनोमटेरियल फोटोकॅटलिस्ट तयार करून संशोधन करण्यात येत आहे. डॉ. गरडकर यांचा स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांमध्ये समावेश आहे. या सर्व संशोधकांचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. कैलास सोनवणे यांनी अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2024
सकाळ

# विद्यापीठात मानसिक आरोग्य सप्ताह

**कोल्हापूर :** पोस्टर प्रदर्शन, जनजागृती रॅली, पथनाट्य, आदी उपक्रमांनी शिवाजी विद्यापीठातील मानसशास्त्र अधिविभाग, व्यवसाय मार्गदर्शन, मानसशास्त्रीय समुपदेशन केंद्रातर्फे जागतिक मानसिक आरोग्य दिन सप्ताह साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले. मानसशास्त्र अधिविभागातील पोस्टर प्रदर्शन स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. त्यानंतर विद्यापीठ परिसरातून जनजागृती रॅली काढण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2024
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे मंगळवारी डॉ. बबन जोगदंड यांचे 'स्पर्धा परीक्षा आणि नोकरीच्या संधी' यावर व्याख्यान आयोजित केले आहे. मानव्यशास्त्र सभागृहात व्याख्यान होईल अशी माहिती केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. जगन कराडे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2024

पुण्यनगरी

# त्रिकोण चित्र प्रदर्शनाचे आज उद्घाटन

**कोल्हापूर :** येथील चित्रकार बबन माने, विजय चोकाककर, राजेंद्र सुतार यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या त्रिकोण या प्रदर्शनाचे उद्घाटन मंगळवार, दि. १५ रोजी दुपारी १ वाजता राजर्षी शाहू कलादालन, दसरा चौक येथे होत आहे. प्रदर्शनाचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे, तर डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. विनोद ठाकूर देसाई यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. हे प्रदर्शन दि. १५ ते २१ ऑक्टोबरपर्यंत सकाळी १०.१५ ते रात्री ८.३० या वेळेत सर्वांसाठी खुले असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2024
तरुण भारत

**व्याख्यान :** शिवाजी विद्यापीठातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने डॉ. बबन जोगदंड यांचे स्पर्धा परीक्षा व नोकरीच्या संधी विषयवर व्याख्यान. स्थळ : मानव्यशास्त्र सभागृह, शिवाजी विद्यापीठ. वेळ : दुपारी ३ वाजता.